**CNR No. MHWR030082772024**
**म.कौ.हिं.प्र.का. अर्ज क्र. १८२/२०२४**
**प्रियंका व इतर १ / अरविंद**
**नि.क्र. १९ खाली**

**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. १ ची शपथेवर साक्ष**

मी सत्य प्रतिज्ञेवर सांगते की —

नाव : प्रियंका अरविंद हत्तीकर,

**अर्जदारातर्फे पुढील सरतपास विद्वान अधिवक्ता श्रीमती पी. ए. जाधव मार्फत**

१३. माझे सरतपासातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो वाचुन व समजुन मी त्यावर सही केली आहे.

**सरतपास पुर्ण**

**गैरअर्जदारातर्फे उलटतपास विद्वान अधिवक्ता श्रीमती एस. व्ही. लिनपाने मार्फत**

१४. हे म्हणणे खरे आहे की, माझे व गैरअर्जदाराचे लग्न झाले त्यावेळी कोरोना कालावधी होता. मी लग्नामध्ये आंदण घेवून सासरी गेल्याबाबत अभिलेखावर त्याची यादी सादर केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला लग्नाचे सुरूवातीचे सहा महिने कोणताही त्रास नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई व सासरे हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यांचे आमचे लग्नापुर्वी एकमेकांकडे जाणे येणे होते.

१५. मी आमच्या लग्नाचा खर्च माझे आईवडीलांनी केल्याचे दर्शविण्याकरीता अभिलेखावर कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. मी गैरअर्जदाराला मिळत असलेल्या उत्पन्नाबाबत अभिलेखावर दस्त दाखल केलेला आहे. साक्षीदार पुढे सांगते की, मी गैरअर्जदाराचे नावे शेती असल्याचा दस्त दाखल केला आहे, त्यातुन मिळत असलेल्या उत्पन्नाबाबत दस्त दाखल केलेला नाही.

१६. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदाराने मी त्याचेसोबत नांदावे याकरीता यवतमाळ येथील न्यायालयात प्रकरण दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यामध्ये हजर झालेले असून ते वर्धा येथील न्यायालयात वर्ग करण्याकरीता मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. मी गैरअर्जदारासोबत नांदण्यास तयार नाही. मी मुलाला शाळेत दाखल केले व त्याला शाळेत पाठवित असल्याबाबत अभिलेखावर दस्त दाखल केलेला नाही. तसेच त्याचे शैक्षणिक खर्चाचा दस्त सुध्दा दाखल केलेला नाही.

१७.		माझे पहिले लग्न सन २०१५ मध्ये झाले होते आणि कायदेशीर घटस्फोट घेतल्यानंतर मी गैरअर्जदारासोबत दुसरे लग्न केलेले आहे. मला पहिल्या लग्नात मानसिक त्रास होता व त्यामुळे मी घटस्फोट घेतला होता.

*मध्यांतरामुळे उलट तपास तहकुब.*

सा. वा. दा. ब. अ. क. के.

माझे समक्ष,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.08.12 16:27:15 +0530

न्यायदंडाधिकारी, प्र.व., वर्धा
दिनांक : १२/०८/२०२६

( वि. प्र. खंदारे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा
(फौजदारी न्यायालय क्र. १)

**CNR No. MHWR030082772024**
**म.कौ.हिं.प्र.का. अर्ज क्र. १८२/२०२४**
**प्रियंका व इतर १ / अरविंद**
**<u>नि.क्र. १९ खाली</u>**

**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. १ ची शपथेवर साक्ष पुर्ववत**

मी सत्य प्रतिज्ञेवर सांगते की —

नाव : प्रियंका अरविंद हत्तीकर,

**<u>गैरअर्जदारातर्फे पुढील उलटतपास विद्वान अधिवक्ता श्रीमती एस. व्ही. लिनपाने मार्फत</u>**

१८. हे म्हणणे खरे आहे की, मी सासरी नांदायला गेले त्यावेळी गैरअर्जदार तेथे त्याचे आईवडीलांसोबत राहत होता. मी गैरअर्जदार दारू पिवून घरी येत असल्याबाबत पोलिसात तक्रार दिली नव्हती. त्याने मला जिवाने मारण्याची धमकी दिली त्यावेळी मी पोलिसात तक्रार दिली होती. मला त्याची नक्की तारीख आज सांगता येणार नाही. मी त्यावेळी बाभुळगाव पोलिस स्टेशनला तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदाराने मला कधीही जिवाने मारण्याची धमकी दिली नव्हती.

१९. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदाराचे संपुर्ण कुटुंब शेतीच्या उत्पन्नावर अवलंबुन आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार जे काही कमवून आणत होता ते मला देत होता. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदाराचे घरचा खर्च तो आणि त्याचे वडील यांचे कमाईवर चालतो. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदाराने अनेक वेळा माझे आईवडीलांना आर्थिक मदत केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याने माझे बहिणीला रूपये १० हजार उसने दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे बहिणीने ते पैसे परत न केल्यामुळे माझा व गैरअर्जदाराचा वाद झाला होता.

२०. गैरअर्जदाराने मला रूपये ५० हजार हुंडयाची मागणी केली होती. त्याने मला सदरची मागणी कधी केली होती हे मला आज नक्की सांगता येणार नाही. मी गैरअर्जदाराने मला मिळालेल्या कोणत्या वस्तु विकल्या याचा तपशील सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे बाळंतपण यवतमाळ येथे झाले होते आणि त्याचा खर्च गैरअर्जदाराचे आईवडीलांनी केला होता. गैरअर्जदार घरी दारू पिवून येत असल्याबाबत आणि त्याचे कोणतीही जबाबदारी पार पाडत

नसल्याबाबत मी माझे आईवडीलांकडे तक्रार केली नव्हती. मी त्याबाबत गैरअर्जदाराला विरोध केला होता.

२१. हे म्हणणे खरे नाही की, माझे स्तनाला गाठ येवून त्रास होत असल्याबाबत गैरअर्जदार मला यवतमाळ येथील दवाखान्यात घेवून गेला होता. हे म्हणणे खरे नाही की, तेथे उपचार होवू शकत नसल्यामुळे गैरअर्जदार मला सेवाग्राम येथील दवाखान्यात घेवून आला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझी सेवाग्राम येथे शस्त्रक्रिया झाली त्यावेळी माझी सासुसुध्दा माझेसोबत दवाखान्यात होती. गैरअर्जदार मला व माझे मुलाला दारू पिवून मारहाण करीत असल्याबाबत आणि त्याबाबत आमचे जिवाला धोका असल्याबाबत मी हिंगणघाट येथील पोलिस स्टेशनमध्ये तक्रार केली होती. मी त्याबाबत अभिलेखावर दस्त दाखल केलेला आहे. मी गैरअर्जदाराचे गाडीवरून पडली आणि मला दुखापत झाली याबाबत मी अभिलेखावर दस्त दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कधीही गाडीवरून पडली नाही व मला दुखापत झाली नाही आणि त्यामुळे त्याबाबत अभिलेखावर दस्त दाखल केलेला नाही.

२२. मी दि. २७/०८/२०२४ रोजी गैरअर्जदाराचे घर सोडले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यावेळी स्वत:हून गैरअर्जदाराचे घर सोडले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी मी घर सोडल्यानंतर पहिल्यांदा गैरअर्जदाराविरूध्द बाभुळगांव पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली होती. पोलिस स्टेशनला तक्रार देतांना माझेसोबत माझे आईवडील व मामी भारती पांडे होती. हे म्हणणे खरे नाही की, माझा पहिला घटस्फोट झाला त्यावेळी सुध्दा माझी मामी माझेसोबत होती. हे म्हणणे खरे नाही की, मला गैरअर्जदाराने घराबाहेर काढले नाही आणि मी स्वत:हून माझे सासरचे घर सोडले आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार कधीही घरी दारू पिवून आला नाही आणि मला कधीही मारहाण केली नाही.

२३. मी माझे आईवडीलांनी माझे बाळंतपणाचा खर्च केल्याचे दाखविणारा दस्त अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच मुलाच्या नामकरणाचा कार्यक्रम माझे आईवडीलांकडे झाला आणि त्याचा खर्च त्यांनी केला हे दाखविणारा दस्त सुध्दा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे दि. १३/१०/२०२० रोजी गैरअर्जदारासोबत लग्न झाल्यापासून ते दि. २७/०८/२०२४ रोजी घर सोडेपर्यंतच्या कालावधीत गैरअर्जदाराविरूध्द कोणत्याही पोलिस स्टेशनला तक्रार दिली नव्हती.

२४.		मी गैरअर्जदाराची दारू सोडविण्याचा प्रयत्न केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, तो दारू पित नसल्यामुळे मी तसा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला गैरअर्जदारासोबत संसार करायचा नसल्यामुळे मी त्याचेविरूध्द खोटी तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

सा. वा. दा. ब. अ. क. के.

माझे समक्ष,

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.08.12 16:27:28 +0530

न्यायदंडाधिकारी, प्र.व., वर्धा
दिनांक : १२/०८/२०२६

( वि. प्र. खंदारे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा
(फौजदारी न्यायालय क्र. १)